संचालनालय लेखा व कोषागारे
महाराष्ट्र राज्य, मुंबई-२०.

13 MAY 2026

प्राप्त झाले सही.........................

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील संचालक संवर्गातील अधिकाऱ्याच्या बदलीबाबत.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन आदेश क्रमांक:-संलेको-२०२६/प्र.क्र.४९/कोषा. प्रशा-२
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :-१३.०५.२०२६.

शासन आदेश

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ४ (४) (दोन) व ४ (५) मधील तरतूदीनुसार बदली करण्यास सक्षम असलेल्या प्राधिकाराच्या मान्यतेने महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील संचालक संवर्गातील खाली नमूद अधिकाऱ्याची स्तंभ क्र.४ मध्ये दर्शविलेल्या पदावर पदस्थापना करण्यात येत आहे:-

अ.क्र	अधिकाऱ्यांचे नाव	सध्याचे पदनाम व कार्यालय	बदलीनंतरची पदस्थापना
१.	२.	३.	४.
१	श्रीम. सुवर्णा राहुल पांडे.	संचालक तथा सहायक प्राध्यापक (अर्थशास्त्र), वसंतराव नाईक राज्य कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, वनामती, नागपूर.	मुख्य लेखा व वित्त अधिकारी, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर

२. श्रीम. पांडे यांनी बदलीच्या पदावर तात्काळ रुजू व्हावे. पदस्थापनेच्या पदावर रुजू न झाल्यास महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९७९ मधील तरतूदींनुसार कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

३. बदलीच्या ठिकाणी हजर होताच शासनास तसेच, संचालक, संचालनालय लेखा व कोषागारे, मुंबई यांना अवगत करावे.

४. श्रीम. पांडे यांनी त्यांच्या नवीन पदाचा कार्यभार स्विकारताच त्यांच्या वैयक्तिक माहितीचा तपशील HRMS मधील नमून्यात भरून नवीन कार्यालय प्रमुखांमार्फत वित्त विभाग तसेच, संचालनालय, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई या कार्यालयास सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(वि. अ. धोत्रे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. सहसचिव, मा. मुख्यमंत्री तथा मंत्री (वित्त) यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई,
२. महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा) महाराष्ट्र, मुंबई/नागपूर, *
३. सध्याचे/बदलीचे कार्यालय प्रमुख*
४. संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई,
५. संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा, कोकण भवन, नवी मुंबई *
६. श्रीम. सुवर्णा पांडे, संचालक संवर्ग *
७. [illegible]